# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(न) [28(2)(t)] नुसार विद्यापीठाच्या अधिसभेवर १० (दहा) नोंदणीकृत पदवीधरांची निवडणूक**

## निवडणूक सूचना

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम २८(२)(न) [28(2)(t)] मधील तरतूदीनुसार विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधरांमधून विद्यापीठाच्या अधिसभेवर १० (दहा) नोंदणीकृत पदवीधरांना निवडून देण्यासाठी दिनांक १७ मे, २०१७ रोजी महाराष्ट्र शासनाने राजपत्राद्वारे प्रसिध्द केलेल्या सन २०१७ चा एकरुप परिनियम क्रमांक ०१ मधील मुद्दा क्रमांक ०९ नुसार ही निवडणूक सूचना देण्यात येत आहे.**

१) सोमवार, दिनांक २१ ऑगस्ट, २०१७ रोजी प्रसिध्द केलेल्या तात्पुरत्या मतदार यादीस व सोमवार, दिनांक ११ सप्टेंबर, २०१७ रोजी प्रसिध्द केलेल्या तात्पुरत्या पुरवणी मतदार यादीस सुचविण्यात आलेल्या पुस्ती व दुरुस्त्या विचारात घेऊन मा. कुलगुरु यांनी मान्य केलेल्या व बुधवार, दिनांक २७ सप्टेंबर, २०१७ रोजी प्रसिध्द केलेल्या अंतिम मतदार यादीप्रमाणे ही निवडणूक घेण्यात येईल.

२) निवडणुकीसाठीच्या जागा : एकूण जागा १०, पैकी ५ जागा खुल्या प्रवर्गासाठी असून ५ जागा खालीलप्रमाणे राखीव प्रवर्गासाठी आरक्षित आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | अनुसूचित जाती (Scheduled Caste) - ०१ जागा | (२) | अनुसूचित जमाती (Scheduled Tribes) - ०१ जागा |
| (३) | निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती) किंवा भटक्या जमाती (De-notified Tribes (Vimukta Jatis) or Nomadic Tribes) - ०१ जागा | (४) | इतर मागास वर्ग (Other Backward Classes) - ०१ जागा |
| (५) | महिला (Woman) - ०१ जागा | | |

३) सदर निवडणुकीचा कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | तपशील | तारीख, वार व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| १ | उमेदवारी अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक, वार, वेळ व स्थळ (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(२)(ख) नुसार निवडणुकीच्या दिनांकाच्या पूर्ण १६ दिवस आधी) | गुरुवार, दि. ०२ नोव्हेंबर, २०१७ (वेळ : सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | निवडणूक विभाग, मुख्य इमारती शेजारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |
| २ | उमेदवारी अर्जांच्या छाननीचा दिनांक, वार, वेळ व स्थळ | शुक्रवार, दि. ०३ नोव्हेंबर, २०१७ (वेळ : सकाळी ११.०० वाजता) | संत ज्ञानेश्वर सभागृह, मुख्य इमारत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |
| ३ | उमेदवारी अर्ज मागे घेण्यासंबंधी लेखी कळविण्याचा दिनांक, वार, वेळ व स्थळ (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(५) नुसार) | सोमवार, दि. ०६ नोव्हेंबर, २०१७ (वेळ : सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | निवडणूक विभाग, मुख्य इमारती शेजारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | निवडणुकीचा दिनांक, वार, वेळ व स्थळ (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. ९ नुसार) | रविवार, दि. १९ नोव्हेंबर, २०१७ (वेळ : सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | या निवडणूक सूचनेसोबत जोडलेल्या मतदान केंद्रांवर **(परिशिष्ट - १)** |
| ५ | मतपत्रिकांची छाननी व मतमोजणीचा दिनांक, वार, वेळ व स्थळ | सोमवार, दि. २७ नोव्हेंबर, २०१७ (वेळ : सकाळी ०८.०० वाजल्यापासून) | विद्यापीठ परिसर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७ |

**४) उमेदवारी अर्ज /उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज भरण्यासंबंधीच्या सूचना :**

उमेदवारी अर्ज व उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावरील Downloads -> Download Nomination Form या लिंकवर उपलब्ध असून सदर अर्ज डाऊनलोड करुन घेता येईल. उमेदवारी अर्ज सादर करण्याच्या विहित वेळेपूर्वी विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावरील Nominations -> Pay Nomination fees या लिंकमार्फत उमेदवारी अर्जाचे शुल्क रु. १०००/- (रुपये एक हजार फक्त) व उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज सादर करण्याच्या विहित वेळेपूर्वी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचे शुल्क रु. २००/- (रुपये दोनशे फक्त) ऑनलाईन पध्दतीने भरता येईल किंवा सदर संबंधित अर्जाचे शुल्क "बँक ऑफ महाराष्ट्र" / "एच.डी.एफ.सी. बँक" या बँकेत चलनाद्वारे भरता येईल. अर्जासोबत संबंधित आवश्यक कागदपत्रे व चलनाद्वारे अथवा ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या शुल्काची पावती जोडून असे अर्ज निवडणूक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे विहित वेळेत जमा करावेत.

**टिप : ऐनवेळेला ऑनलाईन शुल्क भरताना तांत्रिक समस्या उद्‌भवल्यास किंवा चलनाद्वारे शुल्क भरताना बँकेच्या कामकाजाचे दिवस व वेळ पाळली न गेल्यास व त्यामुळे उमेदवाराला विहित वेळेत उमेदवारी अर्ज / उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज भरता न आल्यास त्याला विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.**

**५) उमेदवारांसाठी आवश्यक पात्रता :**

उमेदवार हा नामनिर्देशनाच्या दिनांकापूर्वी किमान पाच वर्षे आधी पदवीधर झालेला असावा. यामध्ये अध्यापक (नियमित किंवा कंत्राटी तत्त्वावरील अध्यापकांचा - मग त्यांचा अध्यापकीय अनुभव काहीही असो), प्राचार्य, विभागप्रमुख, व्यवस्थापन किंवा कलम २८ (२) मध्ये अंतर्भूत असणा-या इतर कोणत्याही प्रवर्गामध्ये मोडणा-या पदवीधरांचा समावेश होणार नाही.

क) योग्यरितीने भरलेले आणि विहित वेळेपूर्वी दाखल केलेले, उमेदवारी अर्जच विचारात घेतले जातील.

ख) राखीव जागेसाठी उमेदवाराने सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची स्वयं-साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

ग) नामनिर्देशनपत्रांवर, मत देण्यासाठी हक्कदार असलेल्या दोन मतदारांकडून दिनांक लिहून स्वाक्षरी करण्यात येईल आणि त्यामध्ये, दिनांक, नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची पूर्ण नावे, पत्ते व पदनामे, कोणतीही असल्यास, आणि स्वाक्षरीकर्त्या मतदारांचा व नामनिर्देशित उमेदवारांचा मतदार क्रमांक यांचा समावेश असेल. कोणत्याही व्यक्तीला, त्याने नामनिर्देशन पत्रावर स्वाक्षरी करुन व दिनांक लिहून त्याची संमती दिल्याखेरीज निवडणुकीतील उमेदवार म्हणून नामनिर्देशित केले जाणार नाही. कोणतीही व्यक्ती, त्याच्या स्वतःच्या नामनिर्देशनामध्ये एकतर सूचक किंवा अनुमोदक असणार नाही. परंतु, जेथे तीनपेक्षा कमी मतदार असतील तेथे उमेदवार, त्याच्या नामनिर्देशनामध्ये स्वतः सूचक व अनुमोदक असू शकेल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(३))

घ) या निवडणूक सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व अटींचे अनुपालन करीत नसलेले नामनिर्देशनपत्र अवैध असेल आणि ते फेटाळले जाईल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(४))

ङ) उमेदवारास निवडणुकीतून माघार घेण्याचा पर्याय खुला असेल : परंतु, अशा उमेदवारास निवडणुकीच्या वेळापत्रकात विहित केलेल्या दिनांकास सायंकाळी ५ वाजण्यापूर्वी विद्यापीठाच्या कार्यालयात व्यक्तिशः किंवा त्याने लिखित स्वरुपात प्राधिकृत केलेल्या व्यक्तीमार्फत त्याने स्वाक्षरीत केलेला नामनिर्देशन मागे घेतल्याचा अर्ज सादर करावा लागेल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(५))

च) उमेदवारी मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा अधिक उमेदवार नसतील तर ते सर्व उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे जाहिर करण्यात येईल.
(एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(८))

छ) उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा उमेदवारांची अंतिम यादी विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

ज) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २८ एप्रिल, २०१७ व त्या संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके/पत्रे यांच्या अन्वये विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकार मंडळावर निवडून येण्यासाठी/नामनिर्देशित होण्यासाठी शासनाने विहित केलेल्या पात्रता शर्ती पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचेच नामनिर्देशन अर्ज ग्राह्य धरण्यात येतील. शासन राजपत्र, शासनाने यासंबंधी वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके/पत्रे तसेच पात्रता शर्तीच्या ग्राह्यतेसंबंधीच्या नियमांबाबतच्या विद्यापीठाचे परिपत्रक क्र. १८१/२०१७, दि. १८ ऑगस्ट, २०१७ यांची प्रत विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर Act/Statutes व Notifications/Circulars या लिंकवर उपलब्ध आहे.

६) उमेदवारी अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या स्वयं-साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. अन्यथा संबंधित नामनिर्देशनपत्र 'अवैध' ठरविण्यात येईल.

१. पदवी प्रमाणपत्र (Degree Certificate).
२. मागासवर्गीयांकरिता राखीव असलेल्या जागेसाठी सक्षम अधिका-याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र (Caste Certificate).
३. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम २८(२)(न) [28(2)(t)] मध्ये नमूद केल्यानुसार अध्यापक (नियमित/ कंत्राटी), प्राचार्य, विभागप्रमुख, व्यवस्थापन या प्रवर्गामधील किंवा या पोटकलमामध्ये नमूद केलेल्या इतर कोणत्याही प्रवर्गात समावेश नसल्याबाबत तसेच संलग्नित महाविद्यालये, संस्था, मान्यताप्राप्त परिसंस्थेचा पदाधिकारी/विश्वस्त नसल्याबाबतचे नामनिर्देशनपत्रासोबत जोडलेल्या विहित नमून्यातील हमीपत्र.

७) उमेदवारी अर्ज छाननी आणि मतमोजणीच्यावेळी स्वतः उमेदवार किंवा त्याने लेखी पत्राव्दारे त्याच मतदार यादीतील मतदार असलेली अधिकृत व्यक्ती प्रतिनिधी म्हणून एक तास अगोदर पूर्वसूचना देऊन ओळखपत्र दाखवून हजर राहू शकेल.

८) मतदारांनी मतदार नोंदणीच्यावेळी निवडलेल्या व त्यानुसार अंतिम मतदार यादीमध्ये नमूद केलेल्या मतदान केंद्रावरच मतदान करावयाचे आहे. मतदान केंद्र कोणत्याही परिस्थितीत बदलून देण्यात येणार नाही. परंतु एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. १३ नुसार निवडणुकीच्या कामावर असणा-या व्यक्तींना, ते ज्या ठिकाणी निवडणुकीच्या कामावर आहेत अशा ठिकाणी आपले मत नोंदविण्याची मुभा असेल.

९) मतदानास येताना मतदारांनी स्वतःचा फोटो असलेले ओळखपत्र उदा. शासकीय / निमशासकीय सेवकांचे कार्यालयीन ओळखपत्र, आधारकार्ड, पारपत्र, वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हींग लायसेन्स) किंवा सर्वसाधारण निवडणुकीसाठी सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले फोटोसहित ओळखपत्र किंवा आयकर अधिका-यांनी (Income Tax) दिलेले फोटोसहित ओळखपत्र (PAN Card) किंवा तत्सम फोटोसहित ओळखपत्र आणणे आवश्यक आहे. **मतदान केंद्रावरील निवडणूक अधिका-यांना हे ओळखपत्र दाखविल्याशिवाय मतदारांना मतपत्रिका मिळणार नाही.**

१०) ही निवडणूक प्रमाणशीर प्रतिनिधित्व पध्दतीनुसार एकक संक्रमणीय मतानुसार परिनियमांव्दारे विहित केल्याप्रमाणे घेण्यात येईल. या निवडणुकीसाठी मतदान हे पसंतीनुसार प्राधान्यक्रम या पध्दतीने करावयाचे आहे. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. ५ व ६)

मा. कुलगुरु यांच्या आदेशावरुन

गणेशखिंड, पुणे ४११००७ )
संदर्भ क्र. साफुपुविनि/२८(२)(न)/९५८ )
दिनांक : २४ ऑक्टोबर, २०१७ )
)

24/10/17
( डॉ. अरविंद दिगंबर शाळिग्राम )
**प्रभारी कुलसचिव**

**प्रत : सर्व संबंधित मतदार.**

(निवडणूक सूचना संदर्भ क्रमांक साफुपुविनि/२८(२)(न)/१५७, दिनांक २४/१०/२०१७ चे परिशिष्ट – १)

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## नोंदणीकृत पदवीधर अधिसभेच्या निवडणूक मतदान केंद्रांची यादी

| अ.क्र. | मतदान केंद्र |
|---|---|
| १. | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे – ४११००७. |
| २. | बाबुरावजी घोलप महाविद्यालय, सांगवी, पुणे - ४११ ०२७. |
| ३. | सी.वाय.दांगट (पाटील) शिक्षण आणि क्रिडा मंडळाचे शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय, वडगाव बु. पुणे ४११०४१. |
| ४. | अभिनव एज्युकेशन सोसायटीचे विधी महाविद्यालय, कात्रज बायपास रोड, आंबेगाव (बु.), पुणे - ४११ ०४६. |
| ५. | माईर्स महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे ४११ ०३८. |
| ६. | आबासाहेब गरवारे महाविद्यालय, कर्वेरोड, पुणे ४११ ००४. |
| ७. | सर परशुरामभाऊ महाविद्यालय, टिळक रोड, पुणे ४११ ०३०. |
| ८. | फर्ग्युसन महाविद्यालय, डेक्कन, पुणे, ४११ ००४. |
| ९. | एच.व्ही.देसाई महाविद्यालय, बुधवार पेठ, पुणे ४११ ००२. |
| १०. | नौरोसजी वाडीया महाविद्यालय, पुणे ४११ ००१. |
| ११. | एम.ई.एस. इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड करिअर कोर्सेस, १३१, मयूर कॉलनी, कोथरूड, पुणे ४११ ०२९. |
| १२. | अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर, पुणे ४११ ०२८. |
| १३. | सिंहगड टेक्नीकल एज्युकेशन सोसायटीचे सिंहगड कॉलेज ऑफ कामर्स, कोंढवा, पुणे - ४११ ०४८. |
| १४. | मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी, यमुनानगर, निगडी, पुणे - ४११ ०४४. |
| १५. | महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी-वाघिरे, पुणे ४११ ०१७. |
| १६. | अनंतराव थोपटे महाविद्यालय, भोर ४१२ २०६, जिल्हा - पुणे. |
| १७. | वाघिरे महाविद्यालय, सासवड ४१२ ३०१, जिल्हा - पुणे. |
| १८. | तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती ४१३ १०२, जिल्हा - पुणे. |
| १९. | इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर ४१३ १०६, जिल्हा - पुणे. |
| २०. | नायगाव शिक्षण संस्थेचे कला व वाणिज्य महाविद्यालय,दौंड ४१३ ८०१, जिल्हा - पुणे. |
| २१. | सी.टी.बोरा महाविद्यालय, शिरुर ४१२ २१०, जिल्हा - पुणे. |
| २२. | हुतात्मा राजगुरु महाविद्यालय, राजगुरूनगर ४१० ५०५, खेड, जिल्हा - पुणे. |
| २३. | बी.डी.काळे महाविद्यालय, घोडेगाव ४१२ ४०८, ता.आंबेगाव, जिल्हा - पुणे. |
| २४. | श्री. शिवछत्रपती महाविद्यालय, जुन्नर ४१० ५०२, जिल्हा - पुणे. |
| २५. | इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव-दाभाडे ४१० ५०७, ता.मावळ, जिल्हा - पुणे. |
| २६. | पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर ४१४ ००१. |
| २७. | एस.एस.एस.पी.एम.कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राहुरी ४१३ ७०५, जिल्हा - अहमदनगर. |
| २८. | आर.बी.एन.बी.महाविद्यालय, श्रीरामपूर ४१३ ७०९, जिल्हा - अहमदनगर. |

| अ.क्र. | मतदान केंद्र |
|---|---|
| २९. | *पी.व्ही.पी. महाविद्यालय प्रवरानगर ४१३ ७१३, ता.राहाता, जिल्हा - अहमदनगर.* |
| ३०. | के.जे.सोमय्या महाविद्यालय, कोपरगाव ४२३ ६०१, जिल्हा - अहमदनगर. |
| ३१. | सहकार महर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, संगमनेर ४२२ ६०५, जिल्हा - अहमदनगर. |
| ३२. | श्री. ज्ञानेश्वर महाविद्यालय, नेवासा ४१४ ६०३, जिल्हा - अहमदनगर. |
| ३३. | अकोले तालुका शिक्षण संस्थेचे अगस्ति कला, वाणिज्य आणि दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले ४२२ ६०१, जिल्हा - अहमदनगर. |
| ३४. | न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालय, शेवगांव ४१४ ५०२, जिल्हा - अहमदनगर. |
| ३५. | बाबुजी आव्हाड महाविद्यालय, पाथर्डी ४१४ १०२, जिल्हा - अहमदनगर. |
| ३६. | जामखेड महाविद्यालय, जामखेड ४१३ २०१, जिल्हा - अहमदनगर. |
| ३७. | दादा पाटील महाविद्यालय, कर्जत ४१४ ४०२, जिल्हा - अहमदनगर. |
| ३८. | श्री. छत्रपती शिवाजी महाविद्यालय, श्रीगोंदा ४१३ ७०१, जिल्हा - अहमदनगर. |
| ३९. | न्यू आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालय, पारनेर ४१४ ३०२, जिल्हा - अहमदनगर. |
| ४०. | एच.पी.टी. कला व आर.वाय.के. विज्ञान महाविद्यालय, नाशिक ४२२ ००५. |
| ४१. | क्रांतिवीर वसंतराव एन.नाईक महाविद्यालय, नाशिक ४२२ ००२. |
| ४२. | भोसला मिलिटरी महाविद्यालय, नाशिक ४२२ ००५. |
| ४३. | के.के.वाघ इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरिंग एज्युकेशन ॲण्ड रिसर्च, पंचवटी, नाशिक ४२२ ००३. |
| ४४. | एन.डी.एम.व्ही.पी.चे कै.शांताराम कोंडाजी वावरे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सिडको, नाशिक ४२२ ००८. |
| ४५. | आर.एन.सी.कला, जे.डी.बी.वाणिज्य व एन.एस.सी. विज्ञान महाविद्यालय, नाशिक रोड, नाशिक ४२२ १०१. |
| ४६. | गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला व भगंवत वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सिन्नर ४२२ १०३, जिल्हा - नाशिक. |
| ४७. | के.पी.जी. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, इगतपुरी ४२२ ४०३, जिल्हा - नाशिक. |
| ४८. | एन.डी.एम.व्ही.पी. कला व वाणिज्य महाविद्यालय, दिंडोरी, जिल्हा - नाशिक. |
| ४९. | के.के.वाघ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पिंपळगाव बसवंत ४२२ २०९, ता.निफाड, जिल्हा - नाशिक. |
| ५०. | एन.डी.एम.व्ही.पी. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मनमाड ४२३ १०४, ता. नांदगाव, जिल्हा - नाशिक. |
| ५१. | कळवण एज्युकेशन सोसायटीचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कळवण ४२३ ५०१, जिल्हा - नाशिक. |
| ५२. | एस.एन.जे.बी. कर्मवीर के.एच.ए. कला आणि एम.जी.एल. वाणिज्य महाविद्यालय, चांदवड ४२३ १०१, जिल्हा - नाशिक. |
| ५३. | कर्मवीर रामरावजी आहेर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, देवळा ४२३ १०२, जिल्हा - नाशिक. |

| अ.क्र. | मतदान केंद्र |
|---|---|
| ५४. | कर्मवीर आबासाहेब उर्फ एन.एम.सोनवणे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सटाणा ४२३ ३०१, ता.बागलाण, जिल्हा - नाशिक. |
| ५५. | महाराजा सयाजीराव गायकवाड कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मालेगांव कॅम्प ४२३ १०५, जिल्हा - नाशिक. |
| ५६. | स्वामी मुक्तानंद विज्ञान महाविद्यालय, येवला ४२३ ४०१, जिल्हा - नाशिक. |
| ५७. | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सायली-सिल्व्हासा ३९६ २३०. (दादरा नगर हवेली) |
| ५८ | प्रोग्रेसिव एज्युकेशन सोसायटीचे मॉडर्न कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे – ४११ ००५. |

AS
24/10/17

(डॉ. अरविंद दिगंबर शाळिग्राम)
प्रभारी कुलसचिव